सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया (नैसर्गीक आपत्ती शाखा)**
**दुरध्वनी क्र.** 07182-236147/ **फॅक्स क्र..** 07182-236145
E-mail - rdcgon@gmail.com, collector.gondia@maharashtra.gov.in

आ.व्य./अका/नैआ/कोरोना/होळीआदेश/कावि/ 262 /2021 दिनांक 25 /03/2021

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई, क्रमांक-आरएलपी-0221/प्र.क्र.95/विशा-1 ब दि. 24 मार्च,2021

## //परिपत्रक//

## होळी, धुलिवंदन व रंगपंचमी-2021 मार्गदर्शक सुचना.

कोविड-19 च्या अनुषंगाने या वर्षी सर्व धर्मिय सण, उत्सव तसेच मोठया स्वरुपातील कार्यक्रम अतिशय साधेपणाने साजरे करण्यात आले आहेत. सध्या गोंदिया व लगतच्या जिल्ह्यात कोरोना बाधित रुग्णांच्या संख्येत पुन्हा एकदा वाढ होतांना दिसत आहे. कोविड-19 चा प्रादुर्भाव अद्यापही असल्याने सर्वांनी मोठया प्रमाणात एकत्रित येऊन उत्सव साजरा करणे उचित होणार नाही. त्यामुळे उदभलेल्या परिस्थतीचा विचार करता यावर्षी **होळी, धुलिवंदन व रंगपंचमी** चा उत्सव अत्यंत साधेपणाने साजरा करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

1. होळी/शिमगा हा सण संपुर्ण गोंदिया जिल्ह्यात मोठया उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी दि. 28/03/2021 रोजी होळीचा सण आहे. कोविड-19 चा वाढता प्रादुर्भाव पाहाता कोणत्याही प्रकारे गर्दी न करता सोशल डिस्टन्सींगच्या नियमांचे पालन करुन हा सण अतिशय साधेपणाने साजरा करावा.
2. दि. 29/03/2021 रोजी धुलिवंदन व 02/04/2021 रोजी रंगपंचमी हे सण साजरे करण्यात येणार आहेत. दरवर्षी या सणानिमित्ताने एकमेंकांवर रंग टाकणे, पाणी टाकणे, एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करण्यात येत असते. परंतु कोविड-19 चा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी धुलीवंदन व रंगपंचमी हे सण साधेपणाने साजरे करावेत. त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडून जनजागृती करणे आवश्यक आहे.
3. होळी/शिमगा निमित्ताने खास करुन पालखीची मिरवणूक काढण्यात येते. परंतु यावर्षी पालखी घरोघरी न नेता मंदिरातच दर्शनाची व्यवस्था होईल याकरीता स्थानिक प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना कराव्यात. तसेच त्याठीकाणी कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व सोशल डिस्टन्सींगचे तंतोतंत पालन होईल याकडे सर्वतोपरी लक्ष देऊन योग्य ती दक्षता घेण्यात यावी.
4. होळी, धुलिवंदन या उत्सवाच्या ठिकाणी मोठ्या स्वरुपाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजीत करु नयेत.
5. जिल्हास्तरावर यापुर्वी शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचनेनुसार वेळोवेळी सुधारणेसह निर्गमीत करण्यात आलेले आदेश व जिल्हास्तरावर निबंध घातलेले सर्व आदेश लागु राहतील.
6. कोविड-19 च्या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महसुल विभाग, आरोग्य विभाग तसेच संबंधित नगरपालिका/नगर पंचायत, पोलिस प्रशासन, स्थानिक प्रशासन यांनी सदर परिपत्रक अन्वये कार्यवाही करावी.

**सदर आदेशाचे पालन न करणारी/उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंध कायदा 1897, आपत्ती व्यवसथापन अधिनियम 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 नुसार अपराध केला असे मानन्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.**

**सदरचे परिपत्रक आज दिं. 25/03/2021 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे**

25/03/21

**(दीपककुमार मीना)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**गोंदिया.**